# प्रेस नोट

दिनांक ०९/०१/२०२५

श्री.राजेश देवराव जाधव, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वर्ग १, खेड, ता. खेड, जि.रत्नागिरी यांना तक्रारदार यांचेकडुन लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांनी ताब्यात घेतले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक / पोलीस ठाणे | चिपळूण पोलीस ठाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.राजेश देवराव जाधव, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वर्ग १, खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी |
| मागणी केलेली लाच रक्कम | ५,००,०००/- रुपये (पाच लाख रुपये) |
| स्विकारलेली लाच रक्कम | १,५०,०००/- रुपये (एक लाख पन्नास हजार रुपये ) |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांनी खेड येथील कंपनीच्या केसमध्ये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वर्ग १, खेड यांचे न्यायालयात वकील पत्र घेतलेले आहे. सरकार पक्षाच्यावतीने सदरची केस श्री.राजेश देवराव जाधव, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता हे पाहत होते. दिनांक २६/१२/२०२४ व दिनांक ०३/०१/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक राजेश जाधव यांनी तक्रारदार यांच्याकडे साक्षीदारांना शिकवणार नाही, तुमची केस सुटण्याकरीता प्रयत्न करेन, जास्त सरतपास न घेता महत्वाचे मुददे वगळुन आरोपी निर्दोष कसे सुटतील व केस लवकर संपवायला मदत करण्यासाठी ५,००,०००/- रुपयांची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन १,५०,०००/- रू. स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झालेले होते. त्यानंतर दिनांक ०९/०१/२०२५ रोजी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक राजेश जाधव यांना तक्रारदार यांचेकडुन १,५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना ओयासीस हॉटेल, चिपळुण येथे दिनांक ०९/०१/२०२५ रोजी १९.१७ वाजता रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| मार्गदर्शन अधिकारी | १) | मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | २) | मा.श्री.संजय गोवीलकर अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ३) | मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ४) | मा. श्री अविनाश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी घटक |

**ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा.**

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893, Mobile No. 7588941247, 9870474535, 7774097874
**Office email** :- acbratnagiri@gmail.com
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

Scanned with ACE Scanner